# महाराष्ट्र साहित्य पत्रिका

जानेवारी ते मार्च २०२१




आंतरराष्ट्रीय ख्यातीचे संशोधक आणि साहित्यिक

## डॉ. जयंत नारळीकर

यांची नाशिक येथे होणाऱ्या ९४ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदी निवड झाल्याबद्दल अभिनंदन !

महाराष्ट्र साहित्य परिषदेचे त्रैमासिक मुखपत्र

# महाराष्ट्र साहित्य पत्रिका

अंक क्र. ३७३, जानेवारी ते मार्च २०२१

संपादक

**डॉ. पुरुषोत्तम काळे**

संपादन समिती

**डॉ. मनोहर जाधव । डॉ. नीलिमा गुंडी**
**डॉ. भास्कर ढोके । डॉ. रणधीर शिंदे**
**डॉ. वर्षा तोडमल**

प्रकाशक

**प्रकाश पायगुडे**
प्रमुख कार्यवाह

**महाराष्ट्र साहित्य परिषद, पुणे**
टिळक रस्ता, पुणे ४११०३०.
दूरभाष । ०२०–२४४७५९६३
संकेतस्थळ । www.masapapune.org
ई–मेल । masaparishad@gmail.com

कार्यालयाची वेळ ।
सकाळी ९.०० दुपारी १२.००
दुपारी ४.३० ते रात्री ८.००

▌मुद्रक–प्रकाशक
**प्रकाश पायगुडे**
प्रमुख कार्यवाह
महाराष्ट्र साहित्य परिषद,
टिळक रस्ता, पुणे ४११०३०

▌जाहिरात व्यवस्थापक
**वि. दा. पिंगळे**
९८८१२३५०३३

▌संपादकीय संयोजन
**संदीप खाडे**

▌अक्षरजुळणी व सजावट
**लक कलाकल्प**

▌मुखपृष्ठ
**जयदीप कडू**

▌मुद्रितशोधन
**आरती देवगांवकर**

▌मुद्रणस्थळ
**एस. ए. प्रिंटर्स, एल. एल. पी.**
फ्लॅट नं. ५, ३ रा मजला,
सिद्धीविनायक अपा.,
शिवदर्शन, पुणे ४११००९

मूल्य : **१५ रुपये**

▌प्रकाशन क्र. ३७३
जानेवारी ते मार्च २०२१

या अंकात व्यक्त झालेल्या
विचारांशी संपादक, संपादन समिती,
सल्लागार मंडळ तसेच प्रकाशक
सहमत असतीलच असे नाही.

# अंतरंग


**मसाप पत्रिका । जानेवारी ते मार्च २०२१ अंक**

- संपादकीय । **डॉ. पुरुषोत्तम काळे । ३**
- जयंत नारळीकरः व्यक्ती आणि वाङ्मय।
  **प्रा. चिन्मय मधू घैसास । ६**
- नवोदितांचा मार्गदर्शक हरवला । **डॉ. अशोक कौतिक कोळी । १२**
- अष्टपैलू व्यक्तिमत्त्वाच्या डॉ. लीला गोविलकर ।
  **डॉ. स्नेहल तावरे । १८**
- मुळीचा झरा **। प्रा. मिलिंद जोशी । २१**
- जागतिकीकरण संस्कृति–संघर्ष करेल ।
  **प्रा. डॉ. मिलिंद कसबे । २४**
- उत्तर महाराष्ट्रातील उद्योग जगताचा इतिहास
  विडीची गोष्ट । **प्रा. डॉ. प्रकाश शेवाळे । ३४**
- लोकजागृतीची चळवळ आणि मूकनायक ।
  **प्रा. डॉ. हरेश शेळके । ४०**
- मराठी कादंबरी अभिरुची आणि राजकारण । **गजानन भोसले । ४७**
- प्रकाशन संस्था व साहित्य व्यवहार ।
  **प्रा. नंदकुमार भाऊसाहेब उदार । ५८**
- झेन । **नारायण लाळे । ६५**
- लोकशाहीर द. ना. गव्हाणकर । **सौ. पूजा पराग सामंत । ७३**
- पटेली– तथात्वभावाचा शोध । **भास्कर ढोके । ७७**
- लाडीः कातकरी समाज जीवनाचे वास्तव चित्रण
  मांडणारी कादंबरी । **प्रा. मिथुन शेळके । ८१**
- एकनाथी भागवतातील शेती । **डॉ. हंसराज जाधव । ८४**
- वळीवः आदिम समाजव्यवस्थेचे संस्कृतीनिष्ठ आकलन ।
  **डॉ. कैलास सलादे । ८९**
- अस्वस्थ मनाचे बंडः आदिवासी साहित्य प्रवाहाला
  समृद्ध करणारी कविता । **डॉ. सखाराम डाखोरे । ९५**
- ओळ तुझ्या माझ्या स्वातंत्र्याची.. यल्गार बोलणारी
  कविता.. । **दत्ता थोरे । १०२**
- समाजभानाची प्रायोगिक जीवनकथा
  (मी गोष्टीत मावत नाही) । **डॉ. सविता पटेल । १०५**
- जागतिकीकरणातील शेतीधारित जगण्याची प्रत्ययकारी
  कविताः आगंतुकाची स्वगते। **प्रा. डॉ. सुभाष निवृत्ती शेकडे । १०८**
- व्यापक जीवनानुभूतींचे तळ ढवळणारे अधांतरीचे प्रश्न।
  **डॉ. अरुण ठोके । ११५**
- मुलूखमाती । **बाळासाहेब कांबळे । १२२**
- सृजन संवाद मुलाखतींच्या मैफिलीची अवीट मेजवानी।
  **दीपक चैतन्य । १२४**
- **कार्यवृत्त । १२६**

सिन्नरमधील विडी– उद्योगाचा इतिहास मांडणाऱ्या आणि विडी– कामगारांच्या व्यथा – वेदनांचे चित्रण करणाऱ्या शंकर बोऱ्हाडे यांच्या विडीची गोष्ट या ग्रंथाचा परिचय करून देणारा लेख.

# उत्तर महाराष्ट्रातील उद्योग जगताचा इतिहासः विडीची गोष्ट

**प्रा. डॉ. प्रकाश शेवाळे**




पुस्तकाचे नाव : **विडीची गोष्ट**
लेखक : **शंकर बोऱ्हाडे**
प्रकाशक : **लोकवाङ्मय गृह, मुंबई**
प्रथम आवृत्ती : **डिसेंबर २०२०**
पृष्ठसंख्या: **२४०** मूल्य : **२५०/–**

**डॉ.** शंकर बोऱ्हाडे यांचा 'विडीची गोष्ट' हा विडी उद्योगावरील ग्रंथ लोकवाङ्मय गृहाने नुकताच प्रकाशित केला आहे. एकूण १३ प्रकरणांमध्ये विभागलेला हा ग्रंथ सिन्नर शहराची माहिती देतानाच उद्यमशील विडी कारखानदारांबरोबर विडी उद्योगाचे रंजक चित्रण, विडी कामगारांच्या व्यथा व वेदनांची क्षणचित्रे डोळ्यासमोर उभी करतो. मुळातच विडी कामगाराच्या घरात जन्मलेले या ग्रंथाचे लेखक डॉ. शंकर बोऱ्हाडे यांनी विडी उद्योगाची वाटचाल उघड्या डोळ्यांनी पाहिली आहे. या विडी कामगारांपुढे त्या काळात फार मोठी स्वप्नं अजिबात नव्हती; पण तरी हे लोक अल्पसंतुष्ट नव्हते. भविष्याच्या दृष्टिकोनातून महत्त्वाचे म्हणजे आपल्या पाल्याचे शिक्षण होय याची जाणीव या प्रत्येक विडी कामगाराला होती. विडी उद्योगामुळे आपल्या पाल्यांच्या शिक्षणाची चांगली सोय झाली व या विडी कामगारांची पुढची पिढी शिकून चांगल्या आर्थिक स्तरापर्यंत पोहोचली. ग्रंथ लेखकही या गोष्टीला अपवाद नाहीत.

सिन्नर या गावाचे दुष्काळाशी कायमचं नातं जोडलेलं होते. हे दुष्काळाचं नातं परंपरागत टिकवत हे गाव परिस्थितीवर मात करीत होते. इथली माणसं दुष्काळात जगण्यासाठी शर्थीने प्रयत्न करत होती. शेती नापिकीमुळे दयनीय अवस्था झाली होती. शेती जिरायती असल्याने फक्त पावसावर अवलंबून राहावे लागत होते. अशा

काळात घरात बसून सावलीत करावयाचा उद्योग म्हणजे विडी वळणे हा एकमेव उद्योग होय. साधारणपणे सव्वाशे वर्षे सिन्नर तालुक्यामध्ये चालत आलेल्या या उद्योगाची पाळेमुळे शोधताना हा उद्योग मुळात सुरू कुठून झाला याचा शोध संशोधन वृत्तीचे लेखक डॉ. बोऱ्हाडे यांनी घेतला आहे. या विडी उद्योगाने सिन्नरचा नावलौकिक सर्व दूर नेला. विसाव्या शतकाच्या उत्तरार्धामध्ये विडी उद्योग का घसरणीला लागला याची कारणमीमांसा करताना डॉ. बोऱ्हाडे यांनी वास्तवाची माहिती दिली आहे. सिन्नरला सुरू झालेली नवीन औद्योगिक वसाहत, इथल्या कामगाराला मिळालेला रोजगार, तंबाखूवर शासन स्तरावरून वेगवेगळे निर्बंध वाढत गेले, चंगळवाद वाढला १९९० नंतर आलेले जागतिकीकरण, उदारीकरण व मुक्त आर्थिक धोरण व त्याचा परिणाम विडी उद्योगाला पण भोगावा लागला. चंगळवादामुळे जनसमूहाच्या ओठातली विडी जाऊन तिची जागा अन्य पर्यायांनी घेतली. त्यामुळे विडी व्यवसाय हळूहळू कमी होत गेला.

सिन्नरचे नाव या विडीने सर्वदूर नेले. सिन्नरची विडी ही अतिशय प्रसिद्ध होती. सिन्नरमध्ये अतिशय महत्त्वाचे उद्योजक होते की, ज्यांनी हाताच्या बोटावर मोजता येतील एवढ्या कामगारांवर हा उद्योग सुरू केला आणि कालांतराने आपला उद्योग भारतात नव्हे तर जगात नेऊन पोहोचवला. विडीच्या माध्यमातून असंख्य विडी कामगारांना रोजगार पुरवला. या सर्व उद्योजकांची उद्योग वाढीची भरारी, त्यांचे आपल्या व्यवसायाप्रति असणारी निष्ठा, शहराच्या विकासात लागणारा हातभार या सर्व बाबींची संशोधनात्मक माहिती डॉ. शंकर बोऱ्हाडे यांनी आपल्या या 'विडीची गोष्ट' या ग्रंथातून दिली आहे.

या ग्रंथातील उद्यमशील विडी कारखानदार या मथळ्याखालील एका प्रकरणात बाळाजी गणपत वाजे यांची शिवाजी शिलेदार विडी, भिकुसा यमासा क्षत्रिय यांची भिकुसा विडी, बस्तीराम सारडा यांची उंट विडी, मिस्टर विडी, शंकर चोथवे यांची गायछाप विडी, रामनाथ शेठ चांडक यांची कोंबडा विडी, चंपालाल चोरडिया यांची संभाजी विडी अशा या सर्व महत्त्वाच्या विडी उद्योगांनी व या उद्योजकांनी कशा पद्धतीने आपला विडीचा उद्योग व व्यवसाय वाढवला याची परिपूर्ण माहिती या ग्रंथात दिली आहे. काळाची पावले ओळखत दुष्काळी भागात लोकांना चांगला उद्योग उपलब्ध करून देत उद्योग व्यवसाय तर या उद्योजकांनी वाढवलाच; पण त्याबरोबर ज्या लोकांच्या हातांना काम नव्हते त्यांना जागेवर व सावलीतले काम उपलब्ध करून दिले. कारखानदारी वाढली आणि ग्रामीण भागातील लोकांना मोठ्या प्रमाणामध्ये रोजगार मिळाला.

सिन्नर शहर पूर्वी नाशिक शहरापेक्षा मोठे होते. नाशिक शहराच्या आधी सिन्नरला नगरपालिका झाली होती. या सिन्नर शहराची रचना ही कौटिल्याच्या अर्थशास्त्रातील रचनेप्रमाणे होती. या साऱ्या सिन्नरचे वर्णन करताना सिन्नर शहराचे वैभव असणाऱ्या गोष्टीचे संशोधनात्मक वर्णन लेखकाने या ग्रंथात केले आहे. शहरातील गल्ल्या, गाव, बुरुज, प्राचीन मंदिरांचे वैभव, सिन्नर शहरांमध्ये असणाऱ्या परंपरा, यात्रा, नाटक मंडळी व इतर कार्यक्रमांचं वर्णन यांचा आढावा अतिशय संतुलितपणे घेतला गेलेला आहे. तसेच या शहरात सण व उत्सव कशा पद्धतीने साजरे होत असत याचे उदाहरणादाखल नमुने लेखकांनी दिले आहेत. सिन्नर शहराला असणारा आजचा ऐतिहासिक, सांस्कृतिक, धार्मिक व राजकीय वारसा तसेच त्याची चालत आलेली परंपरा या ग्रंथामुळे आपणास समजते.

पंधराशे वर्षांपूर्वीचे सिन्नर व आजच्या एकविसाव्या शतकातील सिन्नर तसेच या शहरात झालेला बदल कसा होत गेला असेल या सर्व गोष्टीचा सरकमंच वाचकाच्या डोळ्यासमोरून तरळून जातो. डॉ. बोऱ्हाडे यांनी हा ग्रंथ लिहिताना अनेक संदर्भ ग्रंथांची यादी या ग्रंथातील लेखांमध्ये दिली आहे. सिन्नर शहराची वास्तव ओळख करून देत असतानाच शहराची सांस्कृतिक परंपरासुद्धा वर्णिलेली आहे. सिन्नर तालुक्यात व शहरात असणारी शाहिरी परंपरा, लोकसंस्कृतीचे उपासक व इतर गोष्टीचा आढावा सिन्नर शहरांमध्ये आजपर्यंत जे राजकारणी होऊन गेले या सर्व राजकीय व्यक्ती व सिन्नरची विडी यांचा काय संबंध आहे, येथील बदलती राजकीय परिस्थिती, राजकारण व उद्योग व्यवसाय, सिन्नरच्या विकासात या सर्व गोष्टीचे योगदान काय याचाही विचार या ग्रंथात येतो.

सिन्नर परिसरातील शेतकरी व कष्टकरी वर्ग दुष्काळामुळे जेरीस आला होता. बारा बलुतेदार, आलुतेदार, आदिवासी, कामगार हे सर्व कमी कौशल्याची व श्रमाचे काम शोधत होते, त्यामुळे बरेच जण या व्यवसायामध्ये आले. त्यात स्त्रियांचे प्रमाण अधिक होते.

**सिन्नरचे नाव या विडीने सर्वदूर नेले. सिन्नरची विडी ही अतिशय प्रसिद्ध होती. सिन्नरमध्ये अतिशय महत्त्वाचे उद्योजक होते की, ज्यांनी हाताच्या बोटावर मोजता येतील एवढ्या कामगारांवर हा उद्योग सुरू केला आणि कालांतराने आपला उद्योग भारतात नव्हे तर जगात नेऊन पोहोचवला. विडीच्या माध्यमातून असंख्य विडी कामगारांना रोजगार पुरवला. या सर्व उद्योजकांची उद्योगवाढीची भरारी, त्यांचे आपल्या व्यवसायाप्रति असणारी निष्ठा, शहराच्या विकासात लागणारा हातभार या सर्व बाबींची संशोधनात्मक माहिती डॉ. शंकर बोऱ्हाडे यांनी आपल्या या 'विडीची गोष्ट' या ग्रंथातून दिली आहे.**

महात्मा गांधीजी यांच्या स्वदेशीच्या धोरणामुळे भारतीय विडी उद्योगाला फायदा झाला, असा निष्कर्ष लेखक बोऱ्हाडे यांनी महात्मा गांधी व विडीउद्योग या प्रकरणात काढला आहे. व्यसनांच्या विरोधात असणारे महात्मा गांधी यांनी केवळ स्वदेशीच्या मुद्द्यावर इतर तंबाखू उत्पादनापेक्षा विडीला आश्रय मिळाला व विडी उद्योगाला फायदा झाला; परंतु विडीचे उत्पादन वाढल्यामुळे विडी उद्योगातून रोजगार निर्माण झाला. कारखाने निघाले व विडी उद्योगाचा विस्तार होत गेला. हैदराबादचा वजीर सुलतान यांनी या संधीचा फायदा घेऊन १९१६ साली तंबाखू उद्योग सुरू केला. त्याचा मुलगा मोहम्मद सुलतान यांनी चारमिनार विडी सुरू केली. त्याचबरोबर टोटल, चार्म व एडिशन असे ब्रँड सुरू झालेले आपल्याला दिसतात. एकूणच जगातला सर्वांत श्रीमंत समजला जाणारा हैदराबादचा निजामसुद्धा विडी ओढत होता. त्याचे प्रोत्साहन मिळाल्यानेच तेलंगण, मराठवाड्यात चारमिनार विडी प्रसिद्ध झाली. पुढे उंट व कोंबडा या छापाच्या विड्या मराठवाड्यात पोहोचल्या. जालना येथे विडी कारखाने सुरू झाले. एकूणच विडी सिन्नरमधून मराठवाड्यापर्यंतच नव्हे तर पूर्ण भारतात आणि जगामध्ये कशी पोहोचली याचा इतिहास या ग्रंथांमध्ये आपल्याला वाचायला मिळतो महात्मा गांधीजींनी आश्रमात मजुरांना किमान वेतन काय असावे याचा त्या ठिकाणी विचार केलेला आपल्याला दिसतो. विडीपासून मिळणाऱ्या विरंगुळ्याचे महत्त्व महात्मा गांधीजींना पटले होते याची एक आठवण एकदा देवकिसन सारडा यांनी सांगितल्याचे नमूद केले आहे.

या ग्रंथात उद्यमशील विडी कारखानदारांबद्दल लिहिताना लेखक बोऱ्हाडे यांनी विडी कारखानदारांचा एक मोठा पट मांडला आहे. सिन्नरचे पहिले विडी कारखानदार बाळाजी गणपत वाजे यांची माहिती दिली आहे. सिन्नरमध्ये विडी उद्योग कसा आला याचा शोध घेत लेखक सिन्नरच्या विडी उद्योगाच्या पायाभरणीचे काम करणारे संस्थापक उद्योजक बाळाजी गणपत वाजे यांच्यापर्यंत येऊन पोहचले. वाजे हे कृषी संस्कृतीचे प्रतिनिधी होते. शेतीवाडी असली तरी दुष्काळ पाचवीला पुजलेला होता. पावसाळ्यात पीक घेतले, तर पुढच्या हंगामात उत्पन्न मिळेल याची शाश्वती नाही. शेतकऱ्यांना पशुधन सांभाळण्यासाठी जनावरे घेऊन कोकणात जावे लागत असे. सिन्नरला पाऊस होत नसला तरी जवळच्या घोटी, इगतपुरीच्या पुढे चिक्कार पाऊस होता. साहजिकच ही सगळी मंडळी जनावरे घेऊन कोकणात म्हणजे पडघा, भिवंडीपर्यंत जात असत. तिकडे काही काळ जनावरे सांभाळून मृगाची चाहूल लागण्यापूर्वी शेतीची मशागत करण्यासाठी हे सर्व परतत होते. बाळाजी गणपत वाजे यांना भिवंडी परिसरात जनावरे चारत असताना विडीचा शोध लागला. अतिशय कमी कौशल्यात आणि श्रमात तयार होणाऱ्या विडीचे काम ते एका गृहिणीकडून शिकले. सिन्नरला त्या गृहिणीला आणून त्यांनी अन्य स्त्रियांना प्रशिक्षण दिले. कौशल्य विकासाचे बाळाजी गणपत वाजे हे प्रथम प्रणेते ठरले. डॉ. बोऱ्हाडे यांनी या ग्रंथामध्ये अतिशय सविस्तरपणे विडी उद्योगाची मुहूर्तमेढ रोवणाऱ्या बाळाजी गणपत वाजे यांची माहिती दिली आहे. या ग्रंथामुळे सिन्नरच्या विडी उद्योगाचे प्रणेते वाचकांपर्यंत पोहचतात.

कालांतराने सिन्नरला सुरू झालेला हा विडी उद्योग पाहून अनेक जण या उद्योगाकडे वळले. छोटे कारखानदार वाजे यांच्याकडे तयार झाले. हळूहळू या उद्योगांमध्ये स्पर्धा सुरू झाली. प्रत्येक व्यवसायात जशी नक्कल होते तशी नक्कल विडी उद्योगात आली त्याची अनेक उदाहरणे या ग्रंथात आढळतात. या उद्योगात पैसा येऊ लागला तसा हा

उद्योग वाढत गेला. नावलौकिक वाढला. सिन्नरला स्वातंत्र्यपूर्व काळात भिकुसा यमासा क्षत्रिय यांच्या निमंत्रणावरून डॉ. राजेंद्र प्रसाद येऊन गेले होते. त्यांनी पाठविलेले आभार पत्र फ्रेम करून त्यांच्या ऑफिसमध्ये लावलेले होते. एकूणच उद्योग व्यवसायामुळे राजकीय क्षेत्रातही कसा वावर वाढत जातो याची माहितीही लेखक बोऱ्हाडे यांनी या ग्रंथात दिली आहे.

त्या काळातसुद्धा विडीची जाहिरात केली जात होती. याचे कारण म्हणजे या उद्योगात वाढलेली स्पर्धा होय; पण आजच्यासारखी सामाजमाध्यमे त्या काळात नव्हती. या उद्योगाची जाहिरात आठवडी बाजार, यात्रा व सणासुदीचे दिवस कशा प्रकारे केली जात होती याची माहिती या ग्रंथामध्ये आपणास मिळते. या काळात विडीचे नमुने ग्राहकांना दिले जात असत. अगदी जत्रेत विड्या उधळल्या जात असत. भिकुसा विडीचा व्यवसाय बेळगावपर्यंत विस्तारला होता. भिकुसा विडीची जाहिरात करणाऱ्या गाड्या गावोगाव फिरत असत. या गाड्यांवर स्वरबद्ध केलेली गाणी वाजवली जात असत. ही रेकॉर्ड कोलंबिया कंपनीने काढलेली होती. सदर ग्रंथात लेखकांनी काव्यात्मक जाहिरातीचे नमुनेसुद्धा वानगीदाखल दिले आहेत. उदा. कारखाना विडीचा शानदार/ पोट भरती कित्येक कामगार/ आहे मालक मोठा दिलदार/ त्याची ख्याती हिंदुस्थानपार नंबर चोवीस पिवळ्या दोऱ्याची/विडी ओढा तुम्ही सिन्नरची/ अशी स्वरबद्ध जाहिरात केली जात असे. या सर्व कारखानदारांपैकी काही कारखानदारांना मोठ्या मोठ्या ठिकाणी सन्मानही मिळत असे. संत गाडगेबाबांच्या गो. नी. दांडेकर यांनी लिहिलेल्या चरित्रात नाशिकच्या धर्म शाळेसाठी भिकुसा यमासा क्षत्रिय यांना विश्वस्त नेमल्याचे वर्णन केलेले आहे. गाडगेबाबा धर्मशाळेबाहेर बाबांच्यासोबत क्षत्रिय बंधूंचा फोटोसुद्धा लेखकांनी उपलब्ध करून दिला आहे. एकूणच विडी कारखानदारांचा राबता समाजसुधारकांपासून तर राजकीय, धार्मिक व शैक्षणिक अशा सर्व व्यक्तींबरोबर होता हे सिद्ध होते. नाशिक शहरात गोखले एज्युकेशन सोसायटीचे शाळा व महाविद्यालय सुरू झाले. या महाविद्यालयाला मोठी देणगी विडी कारखानदार जगन्नाथ भिकुसा क्षत्रिय यांनी दिली. येथील शाळा व महाविद्यालयांची इंग्रजी आद्याक्षरे या विडी उद्योजक यांनी दिलेल्या देणगीमुळेच आहेत.

उद्यमशील विडी कारखानदार या प्रकरणात विडी कारखानदारांची ओळख करून देण्याचे काम लेखकाने केले आहे. बाळाजी गणपत वाजे, भिकुसा यमासा क्षत्रिय, रामभाऊ माधवराव निंबाळकर, बस्तीराम नारायणदास सारडा, शंकर भिकाजी चोथवे, रामनाथशेठ चांडक, जगुभाऊ चांडक, लालाशेठ चांडक व चंपालाल चोरडिया अशा अतिशय महत्त्वाच्या सिन्नरमधील उद्योजकांच्या उद्योगवाढीच्या यशस्वी गोष्टी वाचकांपर्यंत पोहोचवल्या आहेत. उद्योगासाठी नुसता पैसा महत्त्वाचा नाही तर प्रचंड इच्छाशक्ती, कामगारांशी असलेले सौहार्दपूर्ण संबंध अशा एक न अनेक गोष्टी मांडताना लेखकांनी कारखानदारीत यशस्वी होण्याची गुरुकिल्ली येथे दिली आहे. बस्तीराम नारायणदास सारडा यांनी तीन कामगारांना बरोबर घेऊन विडी व्यवसायाला सुरुवात केली. अवघे २९ रुपये भांडवल असताना ही सुरुवात झाली. सारडा यांच्या उंट विडीचे नंतरच्या काळात महाराष्ट्रामध्ये नाव झाले. अवघ्या ३ कामगारांवर सुरू झालेला उद्योग– व्यवसाय १९६३ साली जेव्हा बस्तीराम सारडा यांचे निधन झाले तेव्हा १५००० कामगारांपर्यंत पोहोचला होता. अतिशय प्रतिकूल परिस्थितीमध्ये या उद्योजकांनी त्या काळामध्ये अतिशय मोठं काम उभे केले होते. महाराष्ट्रामध्ये सिन्नरचे नाव पोहोचवण्याचं सामर्थ्य या सर्व उद्योजकांचे आहे याची जाणीव या ग्रंथातून आपणास होते.

विडी उद्योगाचा आढावा घेतानाच डॉ. बोऱ्हाडे यांनी या उद्योगांमधील अतिशय महत्त्वाचा घटक कामगार यावर अतिशय विस्तृतपणे माहिती दिली आहे. विडी कारखाने सुरु झाल्यावर हळूहळू असंघटित कामगार संघटित होत गेला. या संघटीकरणासाठी तत्कालीन कामगार नेत्यांनी कसे प्रयत्न केले हे उदाहरणादाखल स्पष्ट केले आहे. सुरुवातीला विडी कामगार नेत्यांमध्ये शंकर सिताराम देशमुख यांचे नाव अग्रभागी होते. देशमुख यांनी कामगारांच्या विविध प्रश्नांसाठी आंदोलने केली व पुढाकार घेतला. देशमुख हे मूळचे सिन्नरचे असल्याने सर्वांशी त्यांचा चांगला संवाद आणि दोस्ताना होता. त्याचा उपयोग प्रेमाने कामगारांचे प्रश्न सोडविण्यासाठी त्यांनी करून घेतला. देव किसन सारडा यांचे घनिष्ठ मित्र असलेले देशमुख काँग्रेस विचारधारेचे कामगार पुढारी होते. काँग्रेसच्या नेत्यांमध्ये त्यांची चांगली उठबस होती. महाराष्ट्राचे शिल्पकार यशवंतराव चव्हाण हे सिन्नर येथे

आले, तर आठवणीने देशमुख यांच्याकडे जात असत. सिन्नर तालुका विडी कामगार संघाचे अध्यक्ष दुर्वेदादा हे होते. त्या काळातील सर्व कामगार नेत्यांनी कामगारांना न्याय मिळवून देण्याचं काम केले आहे. या ग्रंथातून त्या काळात कामगार नेते कसे कामगारांचे भले चिंतीत असत याची यथायोग्य माहिती मिळते.

१९७०च्या दशकात कामगारांचा मोर्चा तहसील कचेरीवर व पोलीस स्टेशनला नेणे, पोलिसांचा लाठीहल्ला होत असे त्यात अनेक कामगार जखमी होत असत. अशा या काळामध्ये कामगारांना न्याय मिळावा यासाठी हे सर्व कामगार नेते प्रयत्न करत होते. कामगार नेत्यांमध्ये कॉम्रेड राजाभाऊ नागरे, कॉम्रेड गोपीनाथ म्हसाळ, काशिनाथ गोळेसर, निवृत्ती आंबेकर, इंदुबाई जाधव, पांडुरंग तिकोणे, नारायण अडणे, दुर्वेदादा, नाना दुर्वे, साथी येनगन्दुल, कॉ. राजू देसले या कामगार नेत्यांनी काय योगदान दिले, त्याची माहिती या ग्रंथामध्ये बघायला मिळते. सिन्नर शहरातील उद्योगामध्ये कामगार चळवळीचे स्थान काय राहिलेले आहे, विडी कामगारांना संघटनेची गरज का वाटत गेली आणि तालुकास्तरापासून ते जिल्हास्तरापर्यंत व तेथून राज्यस्तरापर्यंत कामगार चळवळ व कामगार नेते यांची बांधणी कशी झाली, याचा परिचय लेखकाने करून दिलेला आहे. दत्ता देशमुख यांच्या नेतृत्वाची जडण-घडण झाल्यानंतर त्यांनी कामगारांचा लढा मोठ्या प्रमाणामध्ये पुढे नेला. सक्तीच्या लेव्हीविषयी म्हणजेच लेव्हीविरोधी आंदोलन चालू केले या आंदोलनात विडी कामगारांना सहभागी करून घेण्यात आले. पोलिसांनी केलेले अत्याचार व गोळीबार मोर्चातील नेत्यांवर भरलेले खटले तसेच येरवडा तुरुंगात नेत्यांना स्थानबद्ध कसे केले अशा अनेक गोष्टींची माहिती या ग्रंथातून मिळत जाते. एकूणच वृत्तपत्र, मुलाखती व इतर ग्रंथ यांचा आधार घेत ग्रंथ लेखकांनी ही माहिती उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न केला आहे. गुलाबराव देशमुख यांनी कामगारांची चळवळ कशी चालवली, कामगार चळवळीला कसे नवे वळण लागले? कॉ. राजू देसले रस्त्यावरच्या लढाईतला माणूस या लेखात कामगारांच्या जीवनामध्ये नवीन सूर्य उगवावा याच्यासाठी कॉ. राजू देसले यांनी केलेल्या कामाची माहिती दिली आहे.

विडी कामगारांनी पेन्शन योजनेसाठी दिलेला लढा कामगारांना मिळालेली पेन्शन, २०१२ साली कामगार संघटनेने काढलेला मोर्चा, त्या मोर्चात स्त्रियांचे प्रमाण या सगळ्या गोष्टींची उदाहरणे देत पेन्शन योजनेतील दाहक वास्तव लेखकाने स्पष्ट केले आहे. अगदी ५०० ते १००० रुपयेपर्यंत पेन्शन यावेळी उत्पादक कामगारांना, विडी कामगारांना मिळायला लागली. त्याचा तक्ता लेखकांनी पेन्शन योजनेतील दाहक वास्तव या प्रकरणात दिला आहे. महागाईने कळस गाठला असताना पाचशे, तर एक हजार रुपयापर्यंत निवृत्तीवेतन शासन देते. त्याच्यात काही भागत नाही आणि महागाई असल्यामुळे नऊ हजारापर्यंत पेन्शन मिळावे ही कामगारांची मागणी योग्य असल्याचे तेथे लेखकाने म्हटले आहे.

एकूणच विडी उद्योगाची सुरुवात विसाव्या शतकाच्या सूर्योदयाबरोबर झाली. दुष्काळामुळे सिन्नर शहरांमध्ये विडी उद्योग सुरू झाला, तो बहरला, मोठ्या प्रमाणात वाढला. सुरुवातीला गुजरातमधून मुंबईत आला मुंबईतून भिवंडीमार्गे सिन्नरला आला. विडीसाठी लागणारी पाने विदर्भात पिकत होती. तंबाखूची शेती निपाणी या कर्नाटक प्रांतात होती. त्यामुळे आंध्रप्रदेश, तेलंगणा, मध्यप्रांत व विदर्भात विडी व्यवसाय असावा; पण तो सिन्नरला कसा फोफावत गेला याचे प्रचंड कुतूहल लेखक विडी कामगाराच्या घरात जन्मल्यामुळे होते. त्यामुळे या अतिशय वास्तवाचा शोध या ग्रंथामध्ये दिसतो. विडी सिन्नरवरून २२ किलोमीटर असणाऱ्या नाशिकरोड रेल्वे स्टेशनवर पोहोचवली जात होती. त्यातून खानदेशात वेगवेगळ्या ठिकाणी एजंट नेमून माल दुकानदारांना या पानाच्या ठेल्यावर पोहचवला जात होता. स्वातंत्र्यपूर्व काळामध्ये विडीला मागणी असल्यामुळे धुळे, जळगाव व इतर जिल्ह्यातील व्यापारी सिन्नरला येऊनही बिडीची मागणी करत होते आणि त्याच्यामुळेच विडी उत्पादन वाढत गेले. मागणी तसा पुरवठा होत गेला. जशी मागणी वाढत गेली तशी स्पर्धा वाढत गेली आणि कारखानदार वाढत गेले. या सगळ्या गोष्टींचा अतिशय योग्य पद्धतीने आढावा या ग्रंथामध्ये लेखकाने घेतलेला आपल्याला दिसतो.

जागतिकीकरणाच्या काळामध्ये व्यापार वृद्धीसाठी नवनवीन क्लृप्त्या वापरल्या गेल्या. काही कारखानदारांनी कच्चा माल देऊन पक्का माल तयार करण्याचे तंत्र वापरले; पण तरीही नंतरच्या काळात विडी उद्योगाचा उतरणीचा

**१९७०च्या दशकात कामगारांचा मोर्चा तहसील कचेरीवर व पोलीस स्टेशनला नेणे, पोलिसांचा लाठीहल्ला होत असे त्यात अनेक कामगार जखमी होत असत. अशा या काळामध्ये कामगारांना न्याय मिळावा यासाठी हे सर्व कामगार नेते प्रयत्न करत होते. कामगार नेत्यांमध्ये कॉम्रेड राजाभाऊ नागरे, कॉम्रेड गोपीनाथ म्हसाळ, काशिनाथ गोळेसर, निवृत्ती आंबेकर, इंदुबाई जाधव, पांडुरंग तिकोणे, नारायण अडणे, दुर्वेदादा, नाना दुर्वे, साथी येनगन्दुल, कॉ. राजू देसले या कामगार नेत्यांनी काय योगदान दिले, त्याची माहिती या ग्रंथामध्ये बघायला मिळते.**

काळ सुरू झाला याची कारणमीमांसासुद्धा या ग्रंथात येते. शासनाचे धोरण बदलले व अनेक बंधने आली, त्यामुळे अनेक कारखानदार या उद्योगातून बाहेर पडले. विडी हे धूम्रपानाचे व गरिबाला परवडणारे साधन आहे. मात्र तंबाखूसेवन कर्करोगाला पोषक असल्याच्या मोठमोठ्या जाहिराती लागल्या. विडी बंडलवरही चेतावणीचा मजकूर छापावा लागत होता त्याच्यामुळे विडीचा ग्राहक कमी कमी होत गेला. विडीला या काळात अनेक पर्याय आले आणि या सर्व पर्यायांबरोबर विडीला स्पर्धा करावी लागली. जागतिकीकरणामुळे लोकांच्या खिशात पैसा आल्याने महाग असूनही सिगारेट, गुटखा वा तत्सम पर्यायाकडे लोक आकर्षित झालेले दिसतात. त्याच्यामुळेच विडी उद्योगाला ओहोटी लागलेली आपल्याला दिसते. बदल हा मानवी जीवनाचा स्थायिभाव आहे. समाजात मोठ्या प्रमाणात बदल होताना दिसतो. शिक्षण हे समाज परिवर्तनाचे साधन आहे. शिक्षण प्रसार झाल्याने विडीची जागा नवनवीन उद्योगांनी घेतली. औद्योगिक वसाहतीमध्ये नवीन उद्योग आले. लोकांना रोजगार मिळाले. धरण आणि पाटाच्या पाण्यामुळे या भागातील शेतीही व्यवस्थित पिकू लागली. शेतकरी कुटुंबातील कामगार पुन्हा शेतीकडे वळले. एकूणच या उद्योगाला उतरणीचा काळ आला याची योग्य अशी कारणमीमांसा डॉ. बोऱ्हाडे यांनी केली आहे.

सिन्नर गावाभोवती फिरणारा हा विडी उद्योग पूर्ण जगात आपल्या विडीची ओळख करून देतो. येथील कामगार, कामगार नेते, कारखानदार, सिन्नर शहराची परिपूर्ण ओळख येथील विडी उद्योगाने केली. येथील विडी उद्योग अनेक लोकांचे जीवन फुलवून गेला व सिन्नर गावाला एक महत्त्वाचं स्थान देऊन गेला. विडी उद्योगाने सिन्नरचे रूप पालटले. सांस्कृतिक, सामाजिक, राजकीय आणि शैक्षणिक क्षेत्रामध्ये हा विडी उद्योग सिन्नर शहरांमध्ये अतिशय महत्त्वाचा भाग म्हणून मानला जातो हे लक्षात घेणे गरजेचे आहे, हे या डॉ. बोऱ्हाडे यांच्या ग्रंथावरून सिद्ध होते. आठवणी, जुने ग्रंथ, मुलाखती, वृत्तपत्र, नियतकालिके अशा बहुविध साधनांचा वापर करून लेखक बोऱ्हाडे यांनी हा ग्रंथ सिद्ध केला आहे. मुळात हा ग्रंथ म्हणजे दोन शतकांचा एक संदर्भग्रंथ आहे; पण एक महत्त्वाचा उद्योग कसा बहरला, त्या उद्योगाला बहरण्यासाठी कच्चा माल, कामगार, राजाश्रय, बाजारपेठ व जाहिरात अशा विविध गोष्टींतील वास्तवाची जाणीव येथे महत्त्वाची आहे. उद्योग वाढवताना उद्योजकांना किती गांभीर्य व सौहार्द लागते या सर्व गोष्टी लेखक डॉ. शंकर बोऱ्हाडे यांनी विडीची गोष्ट या ग्रंथात संशोधनात्मक मांडल्या आहेत. हा ग्रंथ एक अतिशय महत्त्वाचा दस्तऐवज आहे.

**डॉ. प्रकाश शेवाळे**
महात्मा गांधी विद्यामंदिर संचलित
म. स. गा. महाविद्यालय, मालेगाव, जि. नाशिक
चलभाष : ८९७५५५५८१५
prof.prakashshewale@gmail.com